क्र.२/निसंवि/महासभा/ ०७ /२०१७-२०१८
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ११ जानेवारी २०१८

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०७ /२०१७-२०१८

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक १९/०१/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

Bidyle 11.1.2018.
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.०५/१२/२०१७ रोजीची तहकूब सभा दि.१८/१२/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवटयाचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील जुना धामणी रोड सांगली या रस्त्यास / मार्गास पद्मभूषण कै.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग असे नामकरण करणेचा इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/१२/२०१७ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली सुतार प्लॉट क्र.४ व.५ कोल्हापूर रोड येथील कुलदैवत श्री.कालीकादेवी, श्री.विश्वकर्मा, श्री.मोनेश्वर महाराज यांचे मंदिरासमोरील रोडला पुर्व-पश्चिम रस्त्यास श्री.विश्वकर्मा पथ मार्ग असे नामकरण करणेचा इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/१२/२०१७.चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी कार्यालया शेजारील सांगलीहून मिरज कडे जाणाऱ्या रस्त्याच्या उत्तरेस असलेले सि.स.नं.४६३०,४४०४ व ४४९७ असे तीन खुले भूखंड मनपा मालकीचे असून, ते पोलीस चौकी उभारणेसाठी व मोर्चा, अंदोलकांना थांबविणेसाठी वापरास देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे विषयपत्र.**

... २ ...

७. महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड स.नं.१५१ ही महानगरपालिकेच्या विकास योजनेनुसार आरक्षण क्र.१७८सिटी पार्क या आरक्षणाने बाधित असलेली जागा मलशुद्धीकरण केंद्र (STP) साठी भूसंपादन करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सांगली यांची सूचनेनुसार २ एकर ३१ गुंठे (१ हे.११.आर.) जागा ताब्यात घ्यावयाची झालेस त्याची नुकसान भरपाई र.रु.२,१०,३६,८००/- होत आहे. परंतु, सदर मिळकतधारक यांनी संपूर्ण क्षेत्र संपादन करणेच्या अटीवर सदर जमिन तब्यात देणेस तयार असलेचे लेखी पत्र दिलेनुसार संपूर्ण क्षेत्र २ हे.०७ आर. (२०७००.००चौ.मि.) क्षेत्राची नुकसान भरपाई र.रु.४,६२,८०,१६०/- मात्र होत आहे. यासाठी सदर जागेमधील १ हे.११ आर.क्षेत्र किंवा २ हे.०७ आर जागा संपादन करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे विषयपत्र.**

८. महापालिका क्षेत्रातील विजयनगर सांगली गिरज रस्त्यापासून मनपाच्या दक्षिण हद्दीपर्यंत द.उ.रस्ता २४.०० मी.रुंदी ऐवजी १८.०० मी.रुंदी करणेबाबत व शासकीय जागेतून दर्शविलेल्या पूर्व पश्चिम चालीच्या १२.०० मी.रुंदीच्या रस्त्याची आखणी रद्द करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये एक महिन्याच्या मुदतीत सूचना हरकती मागवून व त्याप्रमाणे रस्त्याच्या फेरबदलाबाबत मा.शासनास प्रस्ताव सादर करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (नगररचना,कुपवाड) यांचे दि.१६/०९/२०१७ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका हद्दीतील मंगलधाम शॉपिंग सेंटर पहिल्या मजल्यावरील दुकान गाळ्यांचा लिलाव काढणेस मान्यता देणेकामी उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१३/१२/२०१७ चे विषयपत्र.

१०. महानगरपालिका हद्दीतील मंगलधाम शॉपिंग सेंटर दुसऱ्या मजल्यावरील दुकान गाळ्यांचा लिलाव काढणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१३/१२/२०१७ चे विषयपत्र.**

११. महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड स.नं.२९७/१ मधील प्रारुप कलम ३१ (१) नुसार मंजूर झालेला ९.००मी दक्षिण - उत्तर रस्ता हा कलम ३७ खाली स.नं.२९७/१ मधून ४.५०मी. व स.नं.३०५ मधून ४.५० मी. असा फेरबदल करणेस व सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२२/१२/२०१७ चे विषयपत्र.**

१२. महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी सि.स.नं.७४१/१० (भूमापन क्र.३९/८/९) मधील इमारत जागा भाडे तत्वावर भारती विद्यापीठ डिम्ड युनिव्हर्सिटी मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल वानलेसवाडी मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२२/१२/२०१७ चे विषयपत्र.**

१३. महानगरपालिका हद्दीतील कुपवाड सि.स.नं.५२४१ ते ५२५८ या मिळकतीवर दि०४/०४/२०१२ अन्वये महानगरपालिकेच्या कायम झालेल्या भागशः मंजूर विकास योजना नुसार पूर्व-पश्चिम १२ मी नियोजीत रस्त्याबाबत कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस सूचना व हरकती मागविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१९/१२/२०१७ चे विषयपत्र.**

१४. महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील प्रारुप कलम ३१(१) नुसार मंजूर विकास योजना स.नं.३०२/अ या गुंठेवारी रेखांकनामधून जाणारा २४.४० मी रस्ता अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस सूचना व हरकती मागविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१४/१२/२०१७ चे विषयपत्र.**

१५. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली स.नं.३०२/अ/१/१/१ या जागेतील ट्रक पार्किंगचे आरक्षणाखालील जमिनी मधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेबाबत अधिनियमातील कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०३/०१/२०१८ चे विषयपत्र.**

१६. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली स.नं.२२२/१अ,२२४,२२७/२अ+२ब,२२८/३ब,२२५/अ/३, २२५/३अ/३ब, १९४/६ आणि २२१/१ वरील गुंठेवारी विकास नियमित करणेसाठी व त्यावरील आरक्षणे रद्द करणेबाबत अधिनियमातील कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे विषयपत्र.**

१७. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली (विश्रामबाग) येथील सि.स.नं.८९४१ ते ८९५७ (जुना स.नं.३६४/२अ व स.नं.३६४/१) वरील आ.क्र.११७ खोके पुनर्वसन हे पट्टीवजा आरक्षण स्थलांतरीत न करता ते अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन शासनाचे मान्यतेने वगळणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि. ०५/०१/२०१८ चे विषयपत्र.**

१८. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.३८ मधील गट क्र.५४७ मधील खुली जागा खासदार रामदासजी आठवले युथ फाऊंडेशन यांना महापालिकेच्या शर्ती अटीनुसार मा.सहा.संचालक नगररचना यांचेकडून भाडे ठरवून घेवून ९ वर्ष मुदतीने भाड्याने देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/१२/२०१७ चे विषयपत्र.**

१९. महासभा ठराव क्र.२९ दिनांक २०/०५/२०१७ अन्वये वॉर्ड क्र.३ संजयनगर पत्राची चाळमध्ये ऐकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजनेंतर्गत पात्रता निकष पुर्तता करुन दिलेली ५४ झोपडपट्टीधारक लाभार्थी तसेच मा.महासभेने पारित केलेल्या ठरावातील ५ लाभार्थी असे एकूण ५९ लाभार्थी पैकी ५५ लाभार्थींना घरकुलाचा लाभ देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नादानिक) यांचे दि.०९/०१/२०१८ चे विषयपत्र.**

२०. महानगरपालिका हद्दीतील कुपवाड येथील स.नं.१०५ मधील मंजूर विकास योजनेती भाजी मंडई व प्रायमरी स्कूल तसेच, स.नं.२२२ मधील गार्डन व प्रायमरी स्कूल,गार्डन व स.नं.१०४ मधील हायस्कूल या आरक्षणातील जमिनी गुंठेवारी नियमितीकरण करणेबाबत अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन शासनाचे मान्यतेने रहिवास विभागात समावेश करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांची तीन विषयपत्रे.**

२१. महानगरपालिका क्षेत्रातील विद्याविहार कॉलनी वारणाली विश्रामबाग सांगली येथील महापालिकेच्या खुल्या जागेवरील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन IHSDP अंतर्गत बांधणेत आलेल्या घरकुलांमध्ये पुनर्वसन करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नादानिक) यांचे दि.३०/१२/१७ चे विषयपत्र.**

२२. श्री.रामचंद्र दत्तात्रय खरात सफाई कामगार भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांची सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खास बाब म्हणून महापालिका शर्ती-अटीनुसार सेवा वर्ग करुन घेणेस तयार असलेबाबतचे प्रमाणपत्र भिवंडी निजामपूर महापालिकेस सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र.**

२३. दिव्यांग सक्षमीकरण अभियान २०१७ अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग कल्याण ३% निधीतून दिव्यांग व्यक्तींना देणेत येणाऱ्या सुविधांचे (Divyang Empowerment Plan) प्रस्तावास मान्यता देणेकामी **उपायुक्त (दिव्यांग कल्याण कार्या.) यांचे विषयपत्र.**

२४. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

२५. मा.महापौर, यांचे परवानगीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

11.1.2018
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०७/२०१७-१८

महापालिका सभा दिनांक १९/०१/२०१८ करीता.

शुक्रवार दि.१९/०१/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता स्व.भूतपूर्व डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.अनारकली जमिर करणे यांनी दिलेला प्रस्ताव:-

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.२२ मधील सर्वोदय हायस्कुलच्यापिछाडीस असणारे ३० ते ४० वर्षापूर्वीचे सार्वजनिक स्नानगृह पाडणेबाबत चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव:-

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली रमामातानगर येथील नुराणी मस्जिद चौक ते तांबोळी किराणा स्टोअर्स या ५० फूटी रस्त्यास शहीद **अब्दुल हमीद (परमविरचक्र विजेते)** असे नामकरण करणेबाबत चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.सुनिता संजय पाटील यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.२ मधील स.नं.२२९/१/१ मधील डी.पी. रस्त्याने बाधीत होणाऱ्या जागेची नुकसान भारपाई देऊन जागा ताब्यात घेऊन रस्ता करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.३८ मधील पत्रकार नगर लोखमान्य चौकापासून ते शिवमुद्रा चौक कत्तखाना रोड पर्यंत मुख्य मार्गास **कै.सौ.भारती (काकी) पाटील** असे नामकरण करणेबाबत आलेला प्रस्ताव.

५. मा.विजय वसंत घाडगे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५ मधील स.नं.२९७/२ चंद्रप्रभु हौसिंग सोसायटी कुपवाड येथील खुल्या जागेत अमृत योजनेअंतर्गत उद्यान विकसित करण्यात आले आहे. सदर उद्यानाचे **चंद्रप्रभु उद्यान** असे नामकरण करणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

६. मा.युवराज शिवाजीराव गायकवाड यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील पार्वेमेंट कॉलनी मधील राज्य कर्मचारी सोसायटी मधील स.नं.५०१५,५०१८ मध्ये नव्याने उद्यान विकसित करण्यात आले आहे. त्यास कै.कुसुमताई राजाराम पाटील असे नामकरण करणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १७/०१/२०१८

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :-

विषयय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.०५/१२/२०१७ रोजीची तहकूब सभा दि.१८/१२/२०१७ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.९७ ते ठराव क्र.११७ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

महासभा लिपीक

महा-नगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १३०

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील जुना धामणी रोड सांगली या रस्त्यास / मार्गास पद्मभूषण कै.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग असे नामकरण करणेस अध्यक्ष, ऑल मुस्लिम ॲण्ड मायनॉरिटि डेव्हलपमेंटऑर्गनायझेशन यांनी पूर्व कोयला राज्यमंत्री भारत सरकार मा.प्रतिक प्रकाशबापू पाटील यांनी केले लेखी मागणीनुसार उपरोक्त नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १२१

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली सुतार प्लॉटक्र.४ व ५ कोल्हापूर रोड येथील कुलदैवत श्री.कालीकादेवी, श्री.विश्वकर्मा, श्री.मोनेश्वर महाराज यांचे मंदिरासमोरील रोडला पुर्व-पश्चिम रस्त्यास श्री.विश्वकर्मा पथ मार्ग असे नामकरण करणेस अध्यक्ष,श्री.विश्वकर्मा पांचाळ समाज, सांगली यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केलेनुसार अरोक्त नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने सौ.आशा नितीन शिंदे यांनी दिलेली सूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.६७ दिनांक ०६/१०/२०१७- ०९/१०/२०१७ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील सांगली बुरुड गल्ली येथील तांबोळी घर ते कर्नाळ चौक या रस्त्यास दख्खनचा काला पहाड कै.पै.व्यंक्काप्पा बुरुड असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत आली होती. प्रस्तुत नामकरणकामी विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या सूचना व हरकती प्राप्त न झालेने, अरोक्त रस्त्यास दख्खनचा काला पहाड कै.पै.व्यंक्काप्पा बुरुड असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.डिग्रजकर) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. आशा शिंदे) महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :-१३२

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी कार्यालया शेजारील सांगलीहून मिरज कडे जाणाऱ्या रस्त्याच्या उत्तरेस असलेले सि.स.नं.४६३०,४४०४ व ४४९७ असे तीन खुले भूखंड मनपा मालकीचे असून, सदर भूखंडा पैकी एक पोलीस चौकी उभारणेसाठी व एक मोर्चा, अंदोलकांना थांबविणेसाठी व उर्वरित बाग बगीचा विकसीत करणेस मा.प्र.पोलीस अधिक्षक, सांगली यांनी व मा.जिल्हाधिकारीसो यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केलेनुसार वापरास देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

मोर्चा, आंदोलकांना थांबविण्यासाठी [illegible]

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- ७३३

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड स.नं.१५१ ही महानगरपालिकेच्या विकास योजनेनुसार आरक्षण क्र.१७८सिटी पार्क या आरक्षणाने बाधित असलेली जागा मलशुद्धीकरण केंद्र (STP) साठी भूसंपादन करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सांगली यांची सूचविलेनुसार २ एकर ३१ गुंठे (१ हे.११.आर.) जागा ताब्यात घ्यावयाची झालेस त्याची नुकसान भरपाई र.रु.२,१०,३६,८००/- होत आहे. परंतु, सदर मिळकतधारक यांनी संपूर्ण क्षेत्र संपादन करणेच्या अटीवर सदर जमिन ताब्यात देणेस तयार असलेचे लेखी पत्र दिलेनुसार संपूर्ण क्षेत्र २ हे.०७ आर. (२०७००.००चौ.मि.) क्षेत्राची नुकसान भरपाई र.रु.४,६२,८०,९६०/- मात्र होत आहे. यासाठी सदर जागेमधील १ हे.११ आर.क्षेत्र किंवा २ हे.०७ आर जागा संपदान करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकामीच्या विषयावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सदर जागेमधील १ हे.११.आर. (२ एकर ३१ गुंठे) जागा खरेदी करणेत यावी व त्याची नुकसान भरपाई र.रु.२,१०,३६,८००/- मिळकतधारकांना आदा करणेत येवून, भूसंपादनाची कार्यवाही मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचे मार्फत करणेत यावी. तसेच, प्रस्तुत जागेवरील असणारे सिटी पार्कचे आरक्षण उठविणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार फेरबदलाची कार्यवाही पूर्ण करुन, प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा. संचालक नगररचनाकार

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १३४

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (नगररचना,कुपवाड) यांचे दि.१६/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील विजयनगर सांगली मिरज रस्त्यांपासून मनपाच्या दक्षिण हद्दीपर्यंत द.उ.रस्ता २४.०० मी.रुंदी ऐवजी १८.०० मी.रुंदी करणेबाबत व शासकीय जागेतून दर्शविलेल्या पूर्व पश्चिम चालीच्या १२.०० मी.रुंदीच्या रस्त्याची आखणी रद्द करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये एक महिन्याच्या मुदतीत सूचना हरकती मागवून व त्याप्रमाणे रस्त्याच्या फेरबदलाबाबत मा.शासनास प्रस्ताव सादर करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामीच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून खालील प्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

महानगरपालिका क्षेत्राची एकत्रित विकास योजना (भागश:) शासनाने दि.०४/०४/२०१२ रोजी मंजूर केलेली आहे. सदर विकास योजनेत सांगली मिरज रस्ता व पूर्व बाजूकडील २४ मी. रस्त्यालगत जिल्हा न्यायालयासाठी क्षेत्र आरक्षित आहे. जिल्हा न्यायालयीन इमारत पूर्व बाजूकडील विकास योजनेतील २४ मी. रस्त्याने अंशत: बाधीत होत असलेचे आढळून आले आहे. तसेच, न्यायालयाच्या ताब्यातील क्षेत्र पूर्व-पश्चिम चालीच्या १२ मी.रुंदीच्या रस्त्यामुळे विभागणी होत असलेचे दिसून येत आहे. यास्तव सांगली मिरज मुख्य रस्त्यापासून दक्षिणेकडे महापालिका हद्दीपर्यंत असणारा २४ मी.रुंदीचा रस्ता हा १८ मी.रुंदीने कायम ठेवणे योग्य होईल. मात्र, तो ठेवत असताना विद्यमान बांधकामे कमीत-कमी बाधीत होतील अशा पद्धतीने व सद्या अस्तित्वातील रस्त्याचा मध्यापासून दोन्ही बाजूस प्रत्येकी ९मी. याप्रमाणे नियोजित २४ मी. रस्ता रुंदी ऐवजी १८ मी.रुंदीने रस्ता कायम ठेवणे उचित होईल असे या सभेचे मत असून, उपरोक्त २४ मी. रस्त्या ऐवजी १८ मी. रस्ता करणेस तसेच, शासकीय जागेतून दर्शविलेल्या पुर्व पश्चिम चालीच्या १२ मी. रस्त्याची आखणी रद्द करणे आवश्यक असल्याने, सदर १२ मी.रस्त्याची आखणी रद्द करणेस ही सभा मान्यता देत असून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये सदर दोन्ही फेरबदलासाठीचा आवश्यक तो प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस व त्या अनुषंगिक कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.किशोर जामदार)

अनुमोदक :- (मा.[illegible])

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

रचना-सहायक (नगररचना)

महापालिका सचिव,
सांगली मिरज [illegible]महापालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १३५

विषय क्रमांक :- ०९

सोबतची उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१३/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका हद्दीतील मंगलधाम शॉपिंग सेंटर पहिल्या मजल्यावरील दुकान गाळ्याचा लिलाव काढणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका हद्दीतील मंगलधाम शॉपिंग सेंटरमधील पहिल्या मजल्यावरील दुकान गाळा सौ.सुशिला सुकूमार चौगुले यांना मा.महासभा ठराव क्र.१५८ दि.१०/१०/२००६ अन्वये ५४१.०५ चौ.मी. क्षेत्राचे गाळे फक्त वार्षिक भाडे तत्वावर अधिक सर्व कर व वार्षिक भाड्याच्या १०% डिपॉझीट या अटीवर ९ वर्षे मुदतीने प्रत्येक ३ वर्षानी १०% भाडेवाढ याप्रमाणे कर निर्धारक व संकलक यांनी भाडे ठरवून दिलेनुसार अधिनियमातील कलम ७९ नुसार भाडेपट्टयाने देणेस मान्यता देणेत आली होती.

त्यानुसार कर निर्धारक व संकलक यांनी सदर जागेचे वार्षिक भाडे र.रु.५,०३,१७७/- मात्रच्या भाड्याच्या १०% डिपॉझीट र.रु.५०,४००/- मात्र सूचित केलेनुसार सौ.सुशिला सुकूमार चौगुले यांनी डिपॉझीट र.रु.५०,४००/- मात्र पावतीने भरणा केलेली रक्कम जप्त करणेस मा.आयुक्तसाो यांनी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, सौ.सुशिला सुकूमार चौगुले यांची डिपॉझीट पोटी जमा असलेली र.रु.५०,४००/- जप्त करणेस व थकीत असलेली भाडेपट्टाची रक्कम वसुल करणेस ही सभा मान्यता देत असून, उपरोक्त ५४१.०५ चौ.मी. क्षेत्राच्या गाळेचे मा.सहा.संचालक यांनी निश्चित केलेप्रमाणे वार्षिक भाडे र.रु.११,६७,९११/- + GST (१८%) + मिळकतकर (अंदाजे ५०%) अशी एकत्रित अंदाजे र.रु.१९,६२,०९०/- अनामत रक्कमेचा जाहिर लिलाव करणेस व ९ वर्षे मुदतीने भाडे तत्वावर देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. विजय घाडगे)

अनुमोदक :- (जगन्नाथ बापू ठोकळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १३६

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१३/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका हद्दीतील मंगलधाम शॉपिंग सेंटर दुसऱ्या मजल्यावरील दुकान गाळ्याचा लिलाव काढणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका हद्दीतील मंगलधाम शॉपिंग सेंटरमधील दुसऱ्या मजल्यावरील दुकान गाळा सौ.मनिषा सुरेश चौगुले यांना मा.महासभा ठराव क्र.१५८ दि.१०/१०/२००६ अन्वये ५४२.३५ चौ.मी. क्षेत्राचे गाळे फक्त वार्षिक भाडे तत्वावर अधिक सर्व कर व वार्षिक भाड्याच्या १०% डिपॉझीट या अटीवर ९ वर्षे मुदतीने प्रत्येक ३ वर्षांनी १०% भाडेवाढ याप्रमाणे कर निर्धारक व संकलक यांनी भाडे ठरवून दिलेनुसार अधिनियमातील कलम ७९ नुसार भाडेपट्ट्याने देणेस मान्यता देणेत आली होती.

त्यानुसार कर निर्धारक व संकलक यांनी सदर जागेचे वार्षिक भाडे र.रु.५,०४,३८९/- मात्रच्या भाड्याच्या १०% डिपॉझीट र.रु.५०,५००/- मात्र सूचित केलेनुसार सौ.मनिषा सुरेश चौगुले यांनी डिपॉझीट र.रु.५०,५००/- मात्र पावतीने भरणा केलेली रक्कम जप्त करणेस मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, सौ.मनिषा सुरेश चौगुले यांची डिपॉझीट पोटी जमा असलेली र.रु.५०,५००/- जप्त करणेस व थकीत असलेली भाडेपट्टाची रक्कम वसुल करणेस ही सभा मान्यता देत असून, उपरोक्त ५४२.३५ चौ.मी. क्षेत्राच्या गाळेचे मा.सहा.संचालक यांनी निश्चित केलेप्रमाणे वार्षिक भाडे र.रु.११,७१,९२०/- + GST (१८%) + मिळकतकर (अंदाजे ५०%) अशी एकत्रित अंदाजे र.रु.१९,६८,८२५/- अनामत रक्कमेचा जाहिर लिलाव करणेस व ९ वर्षे मुदतीने भाडे तत्वावर देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.विजय घाडगे

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १३७

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२२/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड स.नं.२९७/१ मधील प्रारुप कलम ३१ (१) नुसार मंजूर झालेला ९.००मी दक्षिण - उत्तर रस्ता हा कलम ३७ खाली स.नं.२९७/१ मधून ४.५०मी. व स.नं.३०५ मधून ४.५० मी. असा फेरबदल करणेस व सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस सादर करणेस मान्यता मिळणेकामी प्राप्त प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून, चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महासभा ठराव क्र.९० दि.०१/०९/२०१६ अन्वये प्रारुप कलम ३१ (१) नुसार कुपवाड स.नं.२९७/१ मधील दक्षिणोत्तर ९ मी.कायम झालेल्या रस्त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रस्त्याच्या फेरबदलाबाबत सूचना व हरकती मागविणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. उक्त मान्यतेन्वये सूचना व हरकती मागणी केल्या असता, विहित मुदतीत कोणत्याही लेखी हकती व सूचना महापालिकेकडे प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे कुपवाड स.नं.२९७/१ मधील मंजूर झालेला ९ मी.दक्षिणोत्तर रस्ता हा कलम ३७ अन्वये फेरबदल होवून स.नं.२९७/१ मधून ४.५०मी. व स.नं.३०५ मधून ४.५० मी.असा फेरबदल करणेस व तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.किशोर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक (मा.मनगु ओव्हा सरगर)

सहा.संचालक (नगररचना)

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १३८

विषय क्रमांक :- ११ साठी सूचना

सोबतची श्री.सुरेश देवाप्पा आवटी यांनी दिलेली सूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.७४ दि.०६/१०/२०१७-०९/१०/२०१७ अन्वये महापालिका मिरज स.नं.१४६/३ पै.शाहू कॉलनी मधील आरक्षण क्र.४२८ हायस्कूल आणि प्ले ग्राऊंड या जमिनीवरील दाखल गुंठेवारी भूखंडाचे नियमितीकरण कामी गुंठेवारी छाननी समिती ठराव क्र.०२ दि.१६/०६/२०१७ अन्वये केलेली शिफारस अवलोकनी घेवून निर्णय घेणेकामीचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणेत आला होता.

सबब, महापालिका मिरज स.नं.१४६/३ पै.शाहू कॉलनी मध्ये एकूण ४४ भूखंड असून, त्यापैकी १३ भूखंडाचे क्षेत्र रहिवास विभागात असलेने, त्याचे नियमितीकरण करणेत आलेले आहे. उर्वरीत ३१ प्रस्ताव हे आरक्षणामध्ये समाविष्ठ असून, त्यापैकी २१ बांधीव व १० खुले भूखंड आहेत. सदर जमिनीच्या एकूण क्षेत्रापैकी १२५४३.५० चौ.मी. वरती गुंठेवारी रेखांकन झालेले असून, पैकी ७५% भागावर सदरचे आरक्षण असून, उर्वरित जमीन रहिवास विभागात समाविष्ठ आहे. मिरज स.नं.१४६/३ पै.शाहू कॉलनी मधील आरक्षण क्र.४२८ हायस्कूल आणि प्ले ग्राऊंड (HS & PG) या जमिनीवरील दाखल गुंठेवारी भूखंडाचे नियमितीकरण कामी गुंठेवारी छाननी समिती ठराव क्र.०२ दि.१६/०६/२०१७ अन्वये केलेली शिफारस अवलोकनी घेवून, प्रस्तावीत आरक्षण उठविणेस ही सभा मान्यता देत असून, तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

सह. संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १३९

विषय क्रमांक :- १२

सोबतच उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२२/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी सि.स.नं.७४१/१० (भूमापन क्र.३९/८/९) मधील इमारत जागा भाडे तत्वावर भारती विद्यापीठ डिम्ड युनिव्हर्सिटी मेडीकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल वानलेसवाडी मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महासभा ठराव क्र.९८ दि.२०/०७/२००५ अन्वये भारतीय विद्यापीठ डीम्ड युनिव्हर्सिटी मेडीकल कॉलेज अॅन्ड हॉस्पिटल वानलेसवाडी यांना सांगलीवाडी येथील सि.स.नं.७४१/१० (भूमापन क्र.३९/८/९) मधील इमारत जागा भाडे तत्वावर ९ वर्षे भाडे कराराने कलम ७९ अन्वये देणेत आलेली आहे. विषयपत्रात नमुद असलेप्रमाणे सन २०१७-१८ सालानुसार वार्षिक भाडे र.रु.६,२५,५२८/- याप्रमाणे प्रतिवर्षी भाडे तत्वाने मुदत संपले दिनांकापासून ९ वर्षे मुदतीने व दर तीन वर्षाने २०% भाडे करणेच्या अटीवर भाडे तत्वाने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने मा.किशोर दादासो जामदार यांनी दिलेली सूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महासभा ठराव क्र.३६ दि.०४/०७/२०१७ अन्वये महापालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.३०३ ही जागा हरि विकास चॅरिटेबल ट्रस्ट,सांगली यांना बाग बगीचा विकसित करणेस ९ वर्षे मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव तुर्त प्रलंबित ठेवणेत आलेला होता. सदरची जागेवर हरि विकास चॅरिटेबल ट्रस्ट,सांगली यांनी स्वखर्चाने चांगल्या पद्धतीने उद्यान विकसीत केले असून, त्यांची कोणतीही तोशिष महापालिकेस न लागता, सदर परिसरातील नागरिकांना त्या बगीच्याचा फायदा होणार आहे. यासाठी सदरची जागा बगीच्या विकसीत करणेस देणे योग्य होईल. सदर जागेची देखभाल चांगल्या पद्धतीने होणेच्या दृष्टीने हरि विकास चॅरिटेबल ट्रस्ट,सांगली यांना देखभाल दुरुस्ती करणेस व बगीच्या विकसीत करणेस २९ वर्षे मुदतीने विनामोबदला देणेस ही सभा मान्यता देत आहे.

... २ ...

तसेच, महासभा ठराव क्र.१०४ दि.०५/१२/२०१७-१८/१२/२०१७ अन्वये महानगपालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.११२८४ मधील व्यायाम शाळेची देखभाल दुरुस्ती,खुली जागा विकासीत करणेस रत्ना डेव्हलपर्स,सांगली यांना भाडे तत्वावर देणेसाठी सहा.संचालक,नगररचना यांनी निश्चित केले वार्षिक र.रु.२,५४,६२६/- मात्र (अधिक सेवाकर) प्रमाणे वार्षिक भाडेनुसार प्रतिवर्ष १५% भाडेवाढ करुन, दर तीन वर्षानी पुर्नमुल्यांकन करुन भाडेमुल्य सुधारित करुन घेवून ९ वर्षे मुदतीने महापालिका शर्ती-अटीनुसार भाड्याने देणेचा प्रस्ताव तुर्त प्रलंबित ठेवणेत आला होता. सदरची जागा ही रत्ना डेव्हलपर्स यांनी स्वखचाने डेव्हलप केली असून, त्याचा वापर सर्वसामान्य नागरीकांना सार्वजनिक प्रयोजनाकरीता होणार असलेमुळे व त्याची मालकी महापालिकेची राहणार असलेने, प्रस्तुत प्रस्तावानुसार सदरची जागा सहा.संचालक,नगररचना यांनी निश्चित केले वार्षिक र.रु.२,५४,६२६/- मात्र रक्कमेच्या २५टक्के रक्कम भाडे (अधिक सेवाकर) प्रमाणे वार्षिक भाडेनुसार प्रति तीन वर्षानी १५% भाडेवाढ करुन, २९ वर्षे मुदतीने महापालिका शर्ती-अटीनुसार रत्ना डेव्हलपर्स,सांगली यांना भाडे तत्वावर देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. किशोर जामदार)

अनुमोदक :- (मा. [illegible])

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

प्रस्तुतचा ठराव, मा. [illegible] यांचे निदर्शनास [illegible] कार्यवाही करावी.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४०

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१९/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका हद्दीतील कुपवाड सि.स.नं.५२४९ ते ५२५८ या मिळकतीवर दि०४/०४/२०१२ अन्वये महानगरपालिकेच्या कायम झालेल्या भागश: मंजूर विकास योजना नुसार पूर्व-पश्चिम १२ मी.नियोजीत रस्त्याबाबत कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस सुचना व हरकती मागविणेस मान्यता देणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड सि.स.नं.५२४९ ते ५२५८ या मिळकतींचा गावठाण मध्ये समावेश असून, पूर्वी पासून विद्यमान रहिवास विभागात आहेत.परंतु, महापालिकेच्या कलम २६(१) अन्वयेच्या प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेंतर्गत या मिळकतींचा विद्यमान वापर दर्शविलेला नसलेचे व या मिळकती खालील क्षेत्र खुले दर्शविलेले दिसून येते. त्यामुळे या जागेमधील प्रस्तावीत दक्षिणोत्तर रस्त्याची आखणी देखील अनियमित रुंदीचीच झाली असलेचे दिसते. याशिवाय दक्षिणेकडील सि.स.नं.८३,८४,८६,८६ अ,८७, ९२,९३ यामधील प्रस्तावित दक्षिणोत्तर १८ मी.रस्त्याच्या जोडणी ही उपरोक्त मिळकतीचे उत्तरेकडील १२ मी.रस्त्यास जोडल्यास या रस्त्याची आखणी उपरोक्त मिळकतीपासून पूर्वेस सरकत असलेचे दिसून येते. त्यामुळे रस्ता एका सरळ रेषेत होवून त्याची रुंदी देखील नियमित दर्शविता येईल. तसेच, पूर्वेकडील रि.स.नं.८६ अ/१ या जमिनीच्या पश्चिमेकडील भाग पूर्णत: खुला असून, याठिकाणी प्रस्तावित दक्षिणोत्तर रस्त्याचे स्थान पूर्वेकडे सरकविणे शक्य आहे. या आखणी बदलामुळे प्रस्तुत मिळकती प्रस्तावित रस्ता रुंदीतून वगळला जावून, त्या रहिवास विभागात दर्शविणे शक्य होईल. त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देत असून, तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

सहा.संचालक (नगररचना)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

याशिवाय दक्षिणकडील सि.स.नं. ८३,८४,८६ व ८६ अ ८७ ९२ ९३ यामधील

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४१

विषय क्रमांक :- १४

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१४/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील प्रारुप कलम ३१(१) नुसार मंजूर विकास योजना स.नं.३०२/अ या गुंठेवारी रेखांकनामधून जाणारा २४.४० मी रस्ता अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस सुचना व हरकती मागविणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड येथील प्रारुप कलम ३१ (१) नुसार भारत सुतगिरणी ते यशवंतनगरकडे जाणारा ४५ मी.रस्त्यापासून एस.टी.कॉलनी रस्त्यापर्यंतच्या १०० फुटी रस्त्यास जोडणारा २४.४० मी.नियोजीत रस्ता कायम करणेत आलेला आहे. या रस्त्याच्या आखणीमध्ये स.नं.३०३ व ३०२ मधील विद्यमान बांधकामे पूर्णपणे बाधीत होतात. स.नं.३०२ चे रेखांकन क्र.१९/९८-९९ दि.३१/०७/१९९८ अन्वये मंजूर असून, त्यामध्ये २४.४० मी.रुंद रस्ता सोडणेत आलेला आहे.परंतु, मंजूर रेखांकनातील रस्ता व विकास योजनेतील रस्ता यांची आखणी सुसंगत होत नाही. त्यामुळे विकास योजनेनुसार स.नं.२९८ पर्यंत उपलब्ध असणारा रस्ता व मंजुर स.नं.३०२ ब रेखांकनातील रस्ता यांची आखणी एकमेकास जोडलेस ती योग्य होईल असे या सभेचे मत असून, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, विषयपत्रातील नमुद रस्त्याच्या फेरबदलास ही सभा मान्यता देत असून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये रस्त्याच्या फेरबदलाबाबतचा प्रस्ताव सादर करणेस व त्या अनुषंगिक कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. दिगंबर जाधव)

अनुमोदक :- (मा. संजय पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा. उपायुक्त (नगररचना)

महानगरपालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४२

विषय क्रमांक :- १५

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०३/०१/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली स.नं.३०२/अ/१/१/१ या जागेरील ट्रक पार्किंगचे आरक्षणाखालील जमिनी मधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणे व अधिनियमातील कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली.

सांगली स.नं.३०२/अ/१/१/१ या जागेरील ट्रक पार्किंगचे आरक्षणाखालील जमिनीमधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेसाठी यापूर्वी महासभा ठराव क्र.२३ दि.२०/०५/२०१७ अन्वये निर्णय घेणेत येवून, गुंठेवारी समितीची मान्यता घेवून, फेरप्रस्ताव सादर करणेबाबत ठरविणेत आलेले होते. आता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ महापालिका सभा कामकाज नियम १(र) अन्वये एखादा ठराव पारित झालेनंतर त्यामध्ये तीन महिन्यानंतर दुरुस्ती करणेचे अधिकार महासभेस आहेत. त्यान्वये प्रस्तुत विषयावर ही सभा सर्वानुमते खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली स.नं.३०२/अ/१/१/१ या जागेरील ट्रक पार्किंगचे आरक्षण क्र.१०९ हे आरक्षण विकास आराखड्यामध्ये कायम ठेवणेत आलेले आहे. प्रस्तुत सर्व्हे नंबर मधील ५०% पेक्षा जास्त म्हणजेच, एकूण ५४ भूखंडापैकी ३७ भूखंडांचे प्रस्ताव गुंठेवारी नियमाधीन करणेबाबत दाखल झालेल्या त्यापैकी २६ प्रस्ताव हे बांधकाम झालेल्या भूखंडांचे आहेत व सदरची बांधकामे अनेक वर्षापासून झालेचे निदर्शनास आलेले आहेत. त्यामुळे खुले भूखंड वगळता ज्या क्षेत्रामध्ये बांधकाम झालेली असल्याने, त्या क्षेत्राकरीता प्रस्तावित असलेले ट्रक पार्किंगचे आरक्षण उठवून, त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणे उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, सांगली स.नं.३०२/अ/१/१/१ या जागेरील ट्रक पार्किंगचे आरक्षण क्र.१०९ हे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उठविणेस व त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणेस व त्याप्रमाणे आवश्यक तो प्रस्ताव मा.शासन मान्यतेस पाठविणेस ही सभा मान्यता देत असून, खुल्या भूखंडाचे क्षेत्र भू-संपादन करणेसाठी योग्यती कार्यवाही प्रशासनाने प्रस्तावित करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच, उपरोक्त शासन मान्यता येईतोपर्यंतच्या कालावधीत शासन मान्यतेच्या अधीन राहून, गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्रे प्रशासनाने वितरीत करावीत त्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर,

सहा-संचालक (न.र.)

[illegible] सचिव,
[illegible] महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४३

विषय क्रमांक :- १६

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली स.नं.२२२/१अ,२२४/२,२२७/२अ+२ब,२२८/३ब, २२८/४ पैकी २२५/अ/३, २२५/३अ/३ब, १९४ पैकी आणि २२१/१ वरील गुंठेवारी विकास नियमित करणेसाठी व त्यावरील आरक्षणे रद्द करणेबाबत अधिनियमातील कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली स.नं.२२२/१अ, २२४/२, २२७/२अ+२ब, २२८/३ब, २२८/४ पैकी २२५/अ/३, २२५/३अ/३ब, १९४ पैकी आणि २२१/१ या अनुक्रमे म्युनिसिपल मार्केट, प्राथमिक शाळा व क्रिडागण, प्रायमरी स्कुल ॲन्ड ग्राऊंड, हॉस्पिटल, गार्डन, प्ले गाऊंड चे आरक्षणाखालील जमिनीमधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेसाठी यापूर्वी महासभा ठराव क्र.२४ दि.२०/०५/२०१७ अन्वये निर्णय घेणेत येवून, गुंठेवारी समितीची मान्यता घेवून, फेरप्रस्ताव सादर करणेबाबत उरविणेत आलेले होते. आता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ महापालिका सभा कामकाज नियम १(र) अन्वये एखादा ठराव पारित झालेनंतर त्यामध्ये तीन महिन्यानंतर दुरुस्ती करणेचे अधिकार महासभेस आहेत. त्यान्वये प्रस्तुत विषयावर ही सभा सर्वानुमते खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली स.नं.२२२/१अ,२२४/२,२२७/२अ+२ब,२२८/३ब, २२८/४ पैकी २२५/अ/३, २२५/३अ/३ब, १९४ पैकी आणि २२१/१ या अनुक्रमे म्युनिसिपल मार्केट, प्राथमिक शाळा व क्रिडागण, प्रायमरी स्कुल ॲन्ड ग्राऊंड, हॉस्पिटल, गार्डन, प्ले गाऊंड ची आरक्षणे विकास आराखड्यामध्ये कायम ठेवणेत आलेली आहेत. प्रस्तुत सर्व्हे नंबर मधील ५०% पेक्षा जास्त बांधकामे झालेल्या भूखंडांचे प्रस्ताव नियमाधीन करणेसाठी दाखल झालेले आहेत व सदरची बांधकामे अनेक वर्षापासून झालेचे निदर्शनास आलेले आहेत. त्यामुळे खुले भूखंड वगळता ज्या क्षेत्रामध्ये बांधकाम झालेली आहेत त्या क्षेत्राकरीता प्रस्तावित असलेले आरक्षण उठवून, त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणे उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, महानगरपालिका क्षेत्रातील स.नं.२२२/१अ,२२४/२,२२७/२अ+२ब,२२८/३ब, २२८/४ पैकी २२५/अ/३, २२५/३अ/३ब, १९४ पैकी आणि २२१/१ या अनुक्रमे म्युनिसिपल मार्केट, प्राथमिक शाळा व क्रिडागण, प्रायमरी स्कुल ॲन्ड ग्राऊंड, हॉस्पिटल, गार्डन, प्ले गाऊंड ची आरक्षणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उठविणेस व त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणेस व त्याप्रमाणे आवश्यक तो प्रस्ताव मा.शासन मान्यतेस पाठविणेस ही सभा मान्यता देत असून, खुल्या भूखंडाचे क्षेत्र भू-संपादन करणेसाठी योग्यती कार्यवाही प्रशासनाने प्रस्तावित करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच, उपरोक्त शासन मान्यता येईतोपर्यतच्या कालावधीत शासन मान्यतेच्या अधीन राहून, गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्रे प्रशासनाने वितरीत करावीत त्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

सहा.संचालक (नगररचना)

अनुमोदक :- महापौर,

महापालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १७४

विषय क्रमांक :- १७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि. ०५/०१/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली (विश्रामबाग) येथील सि.स.नं.८९४१ ते ८९५७ (जूना स.नं.३६४/२अ व स.नं.३६४/१) वरील आ.क्र.११७ खोके पुनर्वसन हे पट्टीवजा आरक्षण स्थलांतरीत न करता ते अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन शासनाचे मान्यतेने वगळणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली (विश्रामबाग) येथील सि.स.नं.८९४१ ते ८९५७ (जूना स.नं.३६४/२अ व स.नं.३६४/१) वरील आ.क्र.११७ खोके पुनर्वसन हे पट्टीवजा आरक्षण एकत्रीत विकास योजनेमध्ये दर्शविणेत आले आहे. प्रस्तुतचे आरक्षण प्रस्तावित करताना महापालिकेच्या खुल्या जागेवर आरक्षण ठेवणे ऐवजी लगतच्या रहिवास अधिकृत भूखंडावर दर्शविणेत आलेले आहे. आरक्षणा खालील जमिनीमध्ये पक्क्या स्वरुपाची बांधकामे झालेली आहेत. परंतु, आरक्षणामुळे भूखंड धारकांना जूने पाडून नविन इमारत बांधकाम करणे अथवा वाढीव बांधकाम करणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे मंजूर रेखांकनातील खुल्या जागेवर आरक्षण दर्शविणे ही बाब मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार योग्य नसलेने, सदर पट्टीवजा आरक्षण स्थलांतरीत न करता ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन, शासन मान्यतेने पूर्णपणे वगळणेस व त्यासाठी आवश्यकती प्रशासकीय व वैधानिक कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.किशोर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा.मृणाल पाटील)

महापौर,

सहा.संभाजक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४५

विषयय क्रमांक :- १८

उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/१२/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.३८ मधील गट क्र.५४७ मधील खुली जागा खासदार रामदासजी आठवले युथ फाऊंडेशन यांना देणेबाबत मा.रामदासजी आठवले, सामाजिक न्याय व अधिकारिता राज्य मंत्री,भारत सरकार यांनी दि.०४/०९/२०१७ चे पत्रान्वये मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, शैक्षणिक संकुल, आश्रमशाळा व वृद्धाश्रम उभा करणेस सूचित केले आहे. तसेच सन्मा.सदस्य पै.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे यांनी देखील केलेल्या शिफारशीनुसार सदरची जागा महापालिकेच्या शर्ती अटीनुसार करारपत्र करुन घेवून, मा.सहा.संचालक नगररचना यांचेकडून भाडे ठरवून घेवून ९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस मान्यता मागणी केली आहे. परंतु, प्रस्तुतचा विषय सूर्त प्रलंबित ठेवणेत येत आहे असे ही सभा ठरवित आहे.

सूचक :- [illegible]

अनुमोदक :- [illegible]

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

Bulgle

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४६

विषय क्रमांक :- १९

सोबतचे उपायुक्त (नादानिक) यांचे दि.०९/०१/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महासभा ठराव क्र.२९ दिनांक २०/०५/२०१७ अन्वये वॉर्ड क्र.३ संजयनगर पत्राची चाळमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजनेंतर्गत पात्रता निकष पुर्तता करुन दिलेली ५४ झोपडपट्टीधारक लाभार्थी तसेच मा.महासभेने पारित केलेल्या ठरावातील पाच लाभार्थी असे एकूण ५९ लाभार्थी पैकी ५५ लाभार्थींना घरकुलाचा लाभ देणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा झालेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

माजी महापौर सौ.कांचन युवराज कांबळे यांचे दि.०६/०९/२०१७ च्या पत्रान्वये महापालिका क्षेत्रातील विजय झोपडपट्टी, रुक्मीणी हौसिंग सोसायटी येथील खुल्या जागेतील ५४ झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन IHSDP अंतर्गत बांधणेत आलेल्या घरकुलामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुतचे ५४ लाभार्थी हे मुळ DPR मध्ये समाविष्ठ नाहीत. त्यामुळे या ५४ लाभार्थींची आवश्यकती छाननी प्रशासनाने करुन, पात्र लाभार्थींना संजयनगर पत्राचाळ येथील मंजूर घरकुलाच्या जागेलगत १०० फुटी रोडच्या पश्चिम बाजूस महापालिका मालकीच्या जागेत बांधकाम सुरु करणेत आलेल्या घरकुल इमारतीमध्ये समाविष्ठ करुन लाभ देणेस ही सभा मान्यता देत असून, त्यासाठीचा आवश्यकतो प्रस्ताव मा.शासनाचे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.दिगोर जाधवर)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

अनुमोदक :- (सौ.कांचन कांबळे)

(नादानिक)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४७

विषय क्रमांक :- २०

सोबतची उपायुक्त (नगररचना विभाग) यांची तीन्ही विषयपत्रे या सभेने अवलोकनी घेतली.

महानगरपालिका हद्दीतील कुपवाड येथील स.नं.१०५ मधील मंजूर विकास योजनेती भाजी मंडई व प्रायमरी स्कूल तसेच, स.नं.२२२ मधील गार्डन व प्रायमरी स्कूल,गार्डन व स.नं.१०४ मधील हायस्कूल या आरक्षणातील जमिनी गुंठेवारी नियमितीकरण करणेबाबत अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन शासनाचे मान्यतेने रहिवास विभागात समावेश करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड स.नं.१०५ गंगानगर मधील आरक्षण क्र.३४१ भाजी मंडई, आरक्षण क्र.३०४ व ३०५ प्राथमिक स्कुल व प्ले ग्राऊंड या आरक्षणाखालील जमिनीमधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेसाठी प्रस्तुत सर्व्हे नंबर मधील ५०% पेक्षा जास्त क्षेत्र बांधकाम झालेल्या भूखंडांचे आहे व सदरची बांधकामे अनेक वर्षापासून झालेचे निदर्शनास आले असल्याने, त्या क्षेत्राकरीता प्रस्तावित असलेले आरक्षण उठवून, त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणे उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, कुपवाड स.नं.१०५ गंगानगर मधील आरक्षण क्र.३४१ भाजी मंडई, आरक्षण क्र.३०४ व ३०५ प्राथमिक स्कुल व प्ले ग्राऊंड हे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उठविणेस व त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणेस व त्याप्रमाणे आवश्यक तो प्रस्ताव मा.शासन मान्यतेस पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

... २ ...

कुपवाड स.नं.२२२ मंगलमुर्ती कॉलनी मधील आरक्षण क्र.२ गार्डन व आरक्षण क्र.५ प्राथमिक स्कुल व प्ले ग्राऊंड या आरक्षणाखालील जमिनीमधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेसाठी प्रस्तुत सर्व्हे नंबर मधील ५०% पेक्षा जास्त क्षेत्र बांधकाम झालेल्या भूखंडांचे आहे व सदरची बांधकामे अनेक वर्षापासून झालेचे निदर्शनास आले असल्याने, त्या क्षेत्राकरीता प्रस्तावित असलेले आरक्षण उठवून, त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणे उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, कुपवाड स.नं.२२२ मंगलमुर्ती कॉलनी मधील आरक्षण क्र.२ गार्डन व आरक्षण क्र.५ प्राथमिक स्कुल व प्ले ग्राऊंड हे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उठविणेस व त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणेस व त्याप्रमाणे आवश्यक तो प्रस्ताव मा.शासन मान्यतेस पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

कुपवाड स.नं.१०४ अष्टविनायक नगर मधील आरक्षण क्र.३०२ हायस्कूल या आरक्षणाखालील जमिनीमधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेसाठी प्रस्तुत सर्व्हे नंबर मधील ५०% पेक्षा जास्त क्षेत्र बांधकाम झालेल्या भूखंडांचे आहे व सदरची बांधकामे अनेक वर्षापासून झालेचे निदर्शनास आले असल्याने, त्या क्षेत्राकरीता प्रस्तावित असलेले आरक्षण उठवून, त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणे उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, कुपवाड स.नं.१०४ अष्टविनायक नगर मधील आरक्षण क्र.३०२ हायस्कूलचे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उठविणेस व त्या ठिकाणी असणारी गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणेस व त्याप्रमाणे आवश्यक तो प्रस्ताव मा.शासन मान्यतेस पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, उपरोक्त तिन्ही प्रस्तावाचे कामी शासन मान्यता येईतोपर्यंतच्या कालावधीत शासन मान्यतेच्या अधीन राहून, गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्रे प्रशासनाने वितरीत करावीत त्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.किशोर जाधवार)

अनुमोदक :- (मा.विष्णू माने)

ठराव सर्वानुमते मंजुर

सहा.संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४८

विषय क्रमांक :- २१

सोबतचे उपायुक्त (नादानिक) यांचे दि.३०/१२/१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील विद्याविहार कॉलनी वारणाली विश्रामबाग सांगली येथील महापालिकेच्या खुल्या जागेवरील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन IHSDP अंतर्गत बांधणेत आलेल्या घरकुलांमध्ये पुनर्वसन करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

नगरसेवक श्री.संतोष पाटील व सौ.रोहिणी पाटील यांचे दि.२३/०५/२०१७ च्या पत्रान्वये महापालिका क्षेत्रातील त्याचे वॉर्डातील विद्याविहार कॉलनी वारणाली विश्रामबाग सांगली येथील महापालिकेच्या खुल्या जागेवरील ११ झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन IHSDP अंतर्गत बांधणेत आलेल्या घरकुलामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. तत्कालीन सांगली नगरपरिषद कालावधीत म्हणजेच, दि.१८/१२/१९९२ रोजी विज जोडणीबाबत त्यांना नाहरकत प्रमाणपत्रही देणेत आलेली आहेत. तसेच, महापालिका प्रशासनाकडून झोपडपट्टींचा सर्व्हे होत असताना सदरची झोपडपट्टी नजरचुकीने राहून गेलेली आहे. तसेच, मा.शासनाचे धोरणानुसार झोपडपट्टीमुक्त शहर करणेच्या दृष्टीने सदर लाभार्थींना घरकुलाचा लाभ देणे उचित होईल.

सबब, प्रस्तुतचे ११ लाभार्थी हे मुळ DPR मध्ये समाविष्ठ नाहीत. त्यामुळे या ११ लाभार्थींची आवश्यकती छाननी प्रशासनाने करुन, पात्र लाभार्थींना इंदिरा घरकुल मिरज येथे बांधणेत आलेल्या घरकुलामध्ये तेथील लाभार्थ्यांना लाभ देवून, उर्वरित घरकुलामध्ये सदर ११ लाभार्थ्यांना लाभ देणे मानवतेच्या दृष्टीकोनातून योग्य होणार आहे. तसेच, प्रस्तुत लाभार्थींना घरकुल वाटपाची लॉटरी काढताना त्यांचा नावाचा समावेश करुन व नियमाप्रमाणे भरावा लागणारा लाभार्थी हिस्सा भरुन घेवून, त्यासाठीचा आवश्यकतो प्रस्ताव मा.शासनाचे मान्यतेस्तव सादर करणेत यावा दरम्यानचे कालावधीत शासन मान्यतेच्या अधीन राहून, प्रस्तुत लाभार्थींना मिरज येथे बांधणेत येणाऱ्या घरकुलामध्ये लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.दिग्विजय जाधव)

अनुमोदक :- (मा.संतोष पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

जगदीश पाटील (नादानिक)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १४९

विषय क्रमांक :- २२

सोबतचे आयुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

श्री.रामचंद्र दत्तात्रय खरात सफाई कामगार भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांची सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खास बाब म्हणून महापालिका शर्ती-अटीनुसार सेवा वर्ग करुन घेणेस तयार असलेबाबतचे प्रमाणपत्र भिवंडी निजामपूर महापालिकेस सादर करणेस मान्यता मिळणेकामी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

श्री.खरात यांचे मुळगाव खरातवाडी, ता.वाळवा जि.सांगली असा असून, ते सप्टेंबर १९९५ पासून भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर कायम सेवेत आहेत. त्यांची घरची परिस्थिती हलाखीची असल्याने, त्यांना भिवंडी निजामपूर येथे घर घेणेची आर्थिक स्थिती नसल्याने, राहणेची सोय नसलेमुळे घरभाडे वजाजनिर्वाह करणे तसेच, नोकरी लांब पल्ल्यावर असल्याने, घरातील व्यक्तीचे संगोपन करणे अडचणीचे होत आहे. यासाठी श्री.खरात यांनी गावापासून जवळ असलेल्या सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये सफाई कामगार या पदावर भिवंडी निजामपूर महानगरपालिकेतून कायम स्वरुपी सेवा वर्ग करणेची विनंती आहे. तसेच, मा.आमदार श्री.जयंत पाटील विधासभा सदस्य यांनी देखील सेवा वर्ग होणेस उचित कार्यवाही ठेवणेस शिफारस केलेली आहे.

महापालिकेने मा.शासन निर्देशानुसार व शासनाकडून प्राप्त झाले मॉडेल सेवा प्रवेश नियमानुसार सुधारीत सेवाप्रवेश नियमामधील नियम ३ नेमणूकीची पद्धत व अर्हता मधील खंड ६ मध्ये अन्य महापालिकेतून बदलीने नियुक्तीबाबत नियम करणेत आले असून, त्यामध्ये अन्य समवर्गीय महानगरपालिकेकडून सम संवर्गीय पदावर दोन्ही महानगरपालिकेतील नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या परस्पर संमत्तीने सदर कलमातील अ,ब,क,ड या अटीवर बदलीने नियुक्ती देता येईल अशी तरतुद करणेत आलेली आहे. या तरतुदीप्रमाणे राज्यातील इतर महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमांना यापूर्वी मा.शासनाने मान्यता दिलेली.

तसेच, वसई विरार महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमांनाही मा.शासनाने यापूर्वी मान्यता दिलेली असून, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने वसई विरार महानगरपालिकेच्या धर्तीवरच सेवा प्रवेश नियम तयार केले असलेने त्या मा.शासनाची मंजूरी मिळेल या धारणेवर आणि श्री.खरात यांचीअरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, श्री.रामचंद्र दत्तात्रय खरात सफाई कामगार भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांची सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खास बाब म्हणून महानगरपालिकेच्या शर्ती-अटीनुसार सेवा वर्ग घेणेस तयार असलेचे नाहरकत प्रमाणपत्र भिवंडी निजामपूर महानगरपालिकेस सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

... २ ...

सबब, महानगरपालिकेच्या जुन्या आकृतीबंधानुसार सफाई कर्मचाऱ्यांची एकूण ७५० मंजूर पदापैकी ७२० पदे कार्यरत असून, ३० रिक्त पदापैकी २६ पदांसाठी लाड/पागे शिफारशीच्या भरतीची कार्यवाही सुरु असून, ४ रिक्त पदावर अर्जदार यांचा बदलीने सेवा वर्ग करणेउचित होईल असे या सभेचे मत असून, श्री.खरात यांची सेवा वर्ग करणेस मा.शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.दिगंबर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा.पांडुरंग फिरे)

महापौर,

प्रशासन अधिकारी (आस्थापना)

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १५०

विषय क्रमांक :- २३

सोबतचे उपायुक्त (दिव्यांग कल्याण कार्या.) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

दिव्यांग सक्षमीकरण अभियान २०१७ अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग कल्याण ३% निधीतून दिव्यांग व्यक्तींना देणेत येणाऱ्या सुविधांचे (Divyang Empowerment Plan) प्रस्तावास मान्यता देणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

केंद्र शासनाने अपंग व्यक्ती कायदा समान संधी, हक्क संरक्षण व पूर्ण सहभाग अधिनियम १९९५ दि.०१/०१/१९९६ पासून लागू केलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी किमान ३% निधी राखीव ठेवणेबाबत शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्र.संकिर्ण -२०१० /प्र.क्र.१४६/२०१० दि.३०/१०/२०१० अन्वये निर्देश दिलेले आहेत. सदर ३% निधी नागरी भागातील अपंगांच्या कल्याणाकरीता वापरणेचे आहेत. त्यान्वये महापालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग उदर निर्वाह भत्ता अपंगत्वाची टक्केवारी विचारात घेवून, शासनाच्या धोरणानुसार सुरु करणेस तसेच, अंध-अपंग, कर्णबधीर अपंग, अस्थीव्यंग अपंग यांना त्यांचे मागणीनुसार साहित्य देणेस, दिव्यांग - दिव्यांग व दिव्यांग - अ दिव्यांग व्यक्ती यांचा लग्न प्रस्ताव आलेस त्यांना प्रस्तावित अर्थसहाय्य देणेस तसेच, दिव्यांग व्यक्तीसाठी फिजिओथेरपी सेंटर उभा करुन, तेथे शौचालय बांधणे, दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करणेसाठी, वस्तु खरेदी करणेसाठी अनुदान देणेस, दिव्यांग व्यक्तीसाठी स्पर्धा भरविणेस तसेच, दिव्यांग व्यक्तीसाठी आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये सहभागी होवून विजेते पद मिळविलेल्या दिव्यांगसाठी महापालिकेच्या वतीने प्रोत्साहन निधी देणेस व इतर विषयपत्रातील अनुषंगिक खर्च करणेस तसेच, दिव्यांग व्यक्तींसाठी घरकुल बांधणेसाठी आवश्यक तो प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

उपरोक्त खर्च अर्थसंकल्पातील द्विनोंद क्र.४१२३६- ३% दिव्यांग कल्याण निधी या मंजूर लेखाशिर्षामधून करणेचा आहे.

सूचक :- (मा.कांचन कांबळे)

अनुमोदक :- (मा.सुब्बलक्ष्मी पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

उपायुक्त (दिव्यांग कल्याण कार्या.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १५१

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सौ.अनारकली जमिर कुरणे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.२२ मधील सर्वोदय हायस्कुलच्या पिछाडीस असणारे ३५ ते ४० वषापूर्वीचे तत्कालीन नगरपरिषद अस्तित्वात असताना सार्वजनिक स्नानगृह उभारणेत आलेले आहे. सदरचे स्नानगृह विनावापर असल्याने, त्याची पडझड होवून दुरावस्था झालेली असून, धोकादायक झालेले आहे. त्यामुळे जूने व विनावापर असलेले स्नानगृह पाडणेस ही सभा मान्यता देत असून, याकामी प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (सौ. अनारकली कुरणे)

अनुमोदक :- (श्री.पुरंदर पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

आरोग्याधिकारी,

महापालिका सचिव,
सांगली मि... महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १५२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सौ.स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली रमामातानगर येथील नुराणी मस्जिद चौक ते तांबोळी किराणा स्टोअर्स या ५० फूटी रस्त्यास शहीद अब्दुल हमीद (परमविरचक्र विजेते) असे नामकरण करणेबाबत चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १५३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सौ.सुनिता संजय पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.२ मधील स.नं.२२९/१/१ मधील डी.पी. रस्त्याने बाधीत होणाऱ्या जागेची नुकसान भारपाई देऊन जागा ताब्यात घेऊन रस्ता करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्तावाचे कामी प्रशासनाने योग्यतो सविस्तर प्रस्ताव सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा. संचालक नगररचना

महापालिका सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १५४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.३८ मधील पत्रकार नगर लोकमान्य चौका पासून ते शिवमुद्रा चौक कत्तखाना रोड पर्यंत मुख्य मार्गास कै.सौ.भारती (काकी) पाटील असे नामकरण करणेबाबत आलेला प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १५५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.विजय वसंत घाडगे मा.शिवाजी बाबूराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५ मधील स.नं.२९७/२ चंद्रप्रभु हौसिंग सोसायटी कुपवाड येथील खुल्या जागेत अमृत योजनेअंतर्गत उद्यान विकसित करण्यात आले आहे. सदर उद्यानाचे चंद्रप्रभु उद्यान असे नामकरण करणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक :-

महापौर,

मा.सभा व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- ५५६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.युवराज शिवाजीराव गायकवाड यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील गव्हेमेंट कॉलनी मधील राज्य कर्मचारी सोसायटी मधील स.नं.५०१७,५०१८ मध्ये नव्याने उद्यान विकसित करण्यात आले आहे. त्यास कै.कुसुमताई राजाराम पाटील असे नामकरण करणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. युवराज गायकवाड ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. वंदना स. कुदळे सौ. वं. स. कुदळे महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- १५७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतच्या सन्मा.सदस्यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

श्री.प्रशांत विजयकुमार पाटील

सांगली गावठाण मधील स.नं.१२१/२ ची जागा क्षेत्र २ हेक्टर १८ आर ही श्री.पांजरपोळ संस्था यांच्या मालकीची असून, सदर जागेवर ट्रक पार्किंगचे आरक्षण ठेवणेत आले असून, त्या शेजारीच महापालिकेच्या मालकीची २६ एकर जागा विकसीत न करता पडून आहे. सदर जागा खाजगी ट्रस्टच्या मालकीची असून, सदर जागेवर उत्पादीत होणारी वैरण ही भाकड अपंग व आजारी गायी जगविण्यासाठी वापरली जाते. या हेतूने संस्थेकडे ही एकमेव जमीन असून, त्या संपूर्ण जमिनीवर आरक्षण टाकणे हे अन्यायी असून, संस्थेच्या कार्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करता सन स.नं.१२१/२ वरील ट्रक पार्किंग आरक्षण उठविणेस मान्यता देणे.

श्री.प्रशांत पायगोंडा पाटील

महापालिका हद्दीतील कुपवाड सि.स.नं.३५०१/१/५ मध्ये रेखांकन मंजूर करुन, इमारती बांधकाम करणेत आलेल्या आहेत. परंतु, प्रारुप विकास आराखड्यामध्ये त्याठिकाणी निश्चोजित २४ मी.रुंदीचा रस्ता दर्शविणेत आलेला असल्यामुळे मंजूर रेखांकनातील मिळकती बाधीत होणार अहेत. त्यामुळे प्रस्तावित रस्त्याची रुंदी कमी करणेबाबत योग्यते फेरफार करणेस मान्यता देणे.

सौ.संगिता अभिजीत हारगे

मिरज स.क्र.७५०१/७५०२/७५०३, ६१६८,६१६९ मधील रहिवास भागात बुधवार पेठ हारगे वाडा ते ढंग गल्लीला जोडणारा रस्ता, बुधवार पेठ ढंग गल्ली ते फुटाणे गल्लीला जोडणारा रस्त्यांचे आरक्षण असून, त्या ठिकाणी गेली ४० ते ५० वर्षापासूनची घरे बांधलेली आहे. सदरचा परिसर गावठाण असल्याने, पर्यायी रस्ते असल्याने या रस्त्यांची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर रस्त्याचे आरक्षण ३७ प्रमाणे फेरबदल होवून रद्द करणेस मान्यता देणे.

... २ ...

सौ.संगिता विठ्ठलराव खोत

मिरज स.नं.८७६/१क,३अ या ठिकाणी आरक्षण क्र.३५९ व प्रायमरी स्कुल व आरक्षण क्र.३६० प्ले ग्राऊंड ही आरक्षणे ठेवणेत आलेली असून, या ठिकाणी गेली ४० वर्षापासून नागरीवस्ती असून, नागरिकांनी पक्की घरे बांधलेली आहेत. यासाठी सदर ठिकाणचे आरक्षणे रद्द करुन, रहिवास क्षेत्रात समाविष्ठ करणेस मान्यता देणे.

मिरज समतानगर स.नं.७४९/२ ब या ठिकाणी ट्रक / वाहन पार्किंगचे आरक्षण ठेवणेत आलेले असून, त्या ठिकाणी गेली ४० वर्षापासून नागरी वस्ती असून, नागरिकांना गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्रे देणेत आलेली आहेत. त्यानुसार नागरिकांनी पक्की घरेही बांधलेली आहेत. त्या ठिकाणी महापालिकेकडून सर्व सुविधा दिलेल्या आहेत. यासाठी सदर ठिकाणचे आरक्षणे रद्द करुन, रहिवास क्षेत्रात समाविष्ठ करणेस मान्यता देणे.

श्री.मैनुद्दीन शमशुदीन बागवान

मिरज सि.स.नं.३६९९ व इतर जागा आ.क्र.५२७ प्रायमरी स्कूल या वापरासाठी सुमारे २५० चौ.मी इतके क्षेत्र आरक्षीत आहे. नियोजन प्राधिकरणाने प्राथमिक स्कूल रद्द करुन त्याखालील जागा रहिवास विभागात समाविष्ठ करवी असा निर्णय घेवून आ.क्र.५२७ हे खेळाच्या मैदानासाठी कायम करणेबाबत प्रसिद्ध केलेल आहे. त्यानुसार आरक्षणा खालील क्षेत्र १ हेक्टर दर्शविलेले आहे. सदर आरक्षण सांस्कृतिक केंद्र वापरासाठी आहे. त्यासाठी अन्यत्र जागा उपलब्ध असताना सदर जमिनीवर आरक्षण ठेवणे संयुक्तीक वाटत नाही त्यामुळे प्रस्तावित आरक्षण रद्द करणेस मान्यता देणे.

पै.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

महापालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.३८ स.नं.५५४,५५४/१,५५४/२,५५४,३ सिद्धार्थ परिसर, रोहिदास नगर,चक्कर सडक मधून गेलेला १०० फुटी रस्त्याचे आरक्षण उठविणेस मान्यता देणे.

श्री.पांडूरंग गंगाराम भिसे

सांगलीवाडी स.नं.७६८ व ४१/४/५/६ व ४०/१/२/३ या ठिकाणी प्रायमरी स्कुल व प्ले ग्राऊंड चे आरक्षणे असून, त्या ठिकाणी गेली ५० ते ६० वर्षापासून नागरिकांची घरे आहेत. त्यांना महापालिकेकडून सर्व सुविधा दिलेल्या असून, नागरिकांचेकडून महापालिकेस कर ही भरला जातो. यासाठी सदर ठिकाणचे आरक्षणे रद्द करुन, रहिवास क्षेत्रात समाविष्ठ करणेस मान्यता देणे.

सौ.शुभांगी आनंदा देवमाने

मिरज सि.स.नं.३०३५/अ व ३०५४/ ब व इतर या ठिकाणी रस्त्याचे आरक्षणे असून, त्या ठिकाणी गेली ८० वर्षांपासून घरे आहेत. त्यांना महापालिकेकडून सर्व सुविधा दिलेल्या असून, नागरिकांचेकडून महापालिकेस कर ही भरला जातो. त्यामुळे सदर ठिकाणचे आरक्षणे रद्द करुन, रहिवास क्षेत्रात समाविष्ठ करणेस मान्यता देणे.

सौ.प्रार्थना प्रसाद मदभावीकर

मिरज स.नं.८/१ मधील जागेत रुग्णसेवा प्रकल्प मिरज ही संस्था असून, त्या जागीचे पश्चिम बाजूस आदर्श हौसिंग सोसायटीची मिळकत आहे. सदर रस्ता भूमि अभिलेखान्वये डेड ऐंड असा दाखविला आहे. सदर सोसायटीस सदर रस्ता आवश्यक नसल्याचे त्यांनी ठराबान्वये नमुद केले आहे. तसेच, सदर ठिकाण नागरिकांची रस्त्याबाबत कोणतीही मागणी नाही. तसेच, लगतचे जागेतून पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. यासाठी सदर ठिकाणचे आरक्षणे कायम स्वरुपी रद्द करणेस मान्यता देणे.

मिरज स.नं.३५७६/१,३५३७,३५३८अ, ब, १, ३५३९,३५४०,३५४१,३५४८ व लगतचे अनेक मिळकती यांचेवर पार्किंगचे आरक्षण आहे. त्याठिकाणी आर.सी.सी. घरे असून, सदरचा भाग शहरातील गावठाण भाग आहे. त्यामुळे सदरचे पार्किंगचे आरक्षण कलम ३७ (१) अन्वये कायम स्वरुपी रद्द करणेस मान्यता देणे.

सौ.वंदना सच्चिदानंद कदम

सांगलीवाडी सि.स.नं.१३/क,५ब/१ व १३ क, ५ब/२ या ठिकाणी गार्डनचे आरक्षण ठेवणत आलेले असून, या ठिकाणी गेली ४० वर्षांपासून नागरिकांची घरे आहेत. त्यांना महापालिकेकडून सुविधा दिलेल्या आहेत व त्याचा नागरिकांचेकडून महापालिकेस करही भरला जातो. त्यामुळे सदरचे आरक्षण रद्द करुन रहिवास क्षेत्रात समाविष्ठ करणेस मान्यता देणे.

सौ.कांचन मस्तान भंडारे

म्हापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२५ मधील डी.पी.रस्ता १५.००मी.वेअर हाऊस मागील स.नं.८४१,८४३,८४४,८८७ मधून जुना हरिपूर रस्त्याकडे जाणारा रस्ता, स.नं.८७६ बेथेलहेमनगर येथील प्रायमरी स्कूल व प्ले ग्राउंड, स.नं७९४ ट्रक पार्किंगचे आरक्षण या ठिकाणी असणारी रहिवाशी भागात डी.पी.रस्ता, प्ले ग्राऊंड,शाळा व ट्रकपार्किंगची आरक्षणे ३७ (१) प्रमाणे फेरबदल होवून रद्द करणेस मान्यता देणे.

... ४ ...

श्री.राजू लक्ष्मण गवळी

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.३२ सांगली त्रिमुर्ती कॉलनी परिसरातून डी.पी.रोड जात असून, सदर रस्त्यामुळे साधारण ४० ते ५० घरे बाधीत होत आहेत. बाधीत होणाऱ्या घराचे जागा मालकांना नुकसान भरपाई द्यावी लागणार आहे. महापालिकेकडून त्यांना गुंठेवारी नियमितीकरणाची प्रमाणपत्रे दिलेली असून, नियमितीकरणाचे पैसेही भरलेले आहेत. त्यामुळे सदर डी.पी.रोडचे आरक्षण नगररचना अधिनियमातील कलम ३७ अन्वये उठविणेस मान्यता देणे.

श्री.युवराज शिवाजीराव गायकवाड

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२४ कुपवाड गर्व्हमेंट कॉलनी येथील स.नं.१३२ व १३३ च्या विजय कॉलनी या भागातून डी.पी.रोड जात असून, सदर रस्त्यामुळे साधारण २० ते २५ घरे बाधीत होत आहेत. बाधीत होणाऱ्या घराचे जागा मालकांना नुकसान भरपाई द्यावी लागणार आहे. महापालिकेकडून त्यांना गुंठेवारी नियमितीकरणाची प्रमाणपत्रे दिलेली असून, नियमितीकरणाचे पैसेही भरलेले आहेत. त्यामुळे सदर डी.पी.रोडचे आरक्षण नगररचना अधिनियमातील कलम ३७ अन्वये उठविणेस मान्यता देणे.

श्री.सातपुते बसवेश्वर आनंदराव

मिरज कुंभारखण येथून वाळवे गल्ली पर्यंतचा रस्ता पुर्वापार आहे. परंतु, प्रारुप विकास आराखड्यामध्ये चांभार गल्ली पासून तो सरळ माधवनगर पर्यंतचा जोडणेचा प्रस्तावित रस्ता आहे. त्यामुळे सि.स.नं.३०१३/४,३०१३/५,३०१३/६ व ३०१२ या मिळकती बाधीत होणार आहेत. म्हणून प्रारुप विकास आरखड्यातील प्रस्तावित रस्त्याचे आरक्षण रद्द करणेस मान्यता देणे.

श्री.जुबेर इब्राहिम चौधरी

मिरज प्रभाग क्र.८, कपिला हौसिंग सोसायटी (सी.स.क्र.९५२ (२+३/अ) अल्फोन्सा स्कुल जवळ.कुपवाड रोड मिरज या ठिकाणी नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात असून, या भागातील नागरिकांनी १९९२ साली जागा खरेदी करुन घरे बांधली आहेत. त्या ठिकाणी गेली २०-२५ वर्षांपासून नागरिकांची घरे आहेत. त्यामुळे सदरचे आरक्षण रद्द करणेस मान्यता देणे.

सौ.गुलजार अल्लाबक्ष पेंढारी

महापालिका हद्दीतील स.नं.२५९/२ मधील डी.रस्त्याचे आरक्षण व स.नं.२४९/१ मंगलदोया कॉलनी या गुंठेवारी क्षेत्रातील आरक्षण उठवून रहिवास विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणे.

श्री.सुरेश देवाप्पा आवटी

मिरज,अमन नगर सि.स.नं.१२३ मधून जाणारा नियोजित पु.प.१२ मी.रस्ता आहे. या ठिकाणी गुंठेवारी नियमानुसार लोकांनी २००१ पूर्वी प्लॉटस् खरेदी केली आहेत व त्या ठिकाणी सद्या लोकवस्ती असून, महापालिकेने सर्व सुविधा दिलेल्या आहेत. त्यामुळे तो रद्द करुन रहिवास क्षेत्रात समाविष्ठ करणेस मान्यता देणे.

मिरज वॉर्ड क्र.९ सि.सनं.७४२ /८ अ, ७४२/८ब, ७४२/९ब या ठिकाणी लोकवस्ती झालेली असून, महापालिकेने त्यांना सर्व मुलभूत सुविधा दिलेल्या आहेत. त्यामुळे तेथील आरक्षण क्र.४९९ रद्द करुन, रहिवास विभागात समाविष्ठ करणेस मान्यता देणे.

श्री.विष्णु आण्णासाहेब माने

कुपवाड प्रभाग क्र.१४ ज्ञानेश्वर कॉलनी, पंचशील कॉलनी मधील स.नं.१०६/१ मध्ये बगीचा आरक्षण आहे. त्या ठिकाणी दाट नागरी वस्ती असून, गेली २० वर्षापासून वसलेली आहे. त्या भागातील नागरिकांची खरेदी पत्र सन २०००० पूर्वीची आहेत. त्यामुळे सदरचे आरक्षण उठविणेस मान्यता देणे.

उपरोक्त प्राप्त झालेल्या सूचनांवर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. सूचनांमध्ये नमुद आरक्षणे उठविणे,वगळणे व फेरफार करणेबाबत सहा.संचालक नगररचना यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून, पहाणी करुन उपरोक्त सादर केले प्रस्तावानुसार वस्तुनिष्ठ अहवाल प्रत्येकी स्वतंत्ररित्या महासभेसमोर सादर केलेस, त्यावर निर्णय घेणे उचित होईल असे या सभेचे स्पष्ट मत असून, उपरोक्त प्रस्तावांचे प्रत्येकी स्वतंत्ररित्या प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर

सहा.संचालक (नगररचना)

प्रस्तुतचा सुचनेद्वारे पारित झालेला ठराव, मा.आयुक्त यांचे निदर्शनास आनुन पुढील कार्यवाही करावी.

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १९/०१/२०१८

ठराव क्रमांक :- ५५८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सौ.गुलजार अल्लाबक्ष पेंढारी यांनी दिलेली सूचना सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.२४ दि.२०/०५/२०१७- २३/०५/२०१७ अन्वये महानगरपालिका हद्दीतील मंजूर विकास योजनेची आरक्षणाखालील जमिनी मधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेसाठी सन्माननिय सदस्यांचे मागणी प्रमाणे सूचना हरकती मागवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेसाठी सदरचे प्रस्ताव गुंठेवारी समितीच्या सभेसमोर ठेवून, गुंठेवारी समितीच्या शिफारशीने फेर प्रस्ताव सादर करणेस आदेशित करणेत आले होते.

त्यानुसार सांगली स.नं.२५८/१ राजीवनगर या जागेवर कलम ३१(१) अन्वये मंजूर विकास योजनेमध्ये आ.क्र.१०२ हायस्कूल व प्ले ग्राऊंड चे आरक्षण आहे. या जमिनीचे क्षेत्र २००००.०० चौ.मी.इतके आहे. सदर जमिनीमध्ये एकूण १०५ भूखंड असून, पैकी ९० भूखंडांचे प्रस्ताव दाखल आहेत. सदर आरक्षण वगळणेकामी यापूर्वी महासभा ठराव क्र.२४८ दि.२०/१०/२०११ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. तथापि, मंजूर विकास योजनेमध्ये सदरचे आरक्षण कायम ठेवणेत आलेले आहे. सदर जमिनीवरील गुंठेवारी विकास नियमितीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन, त्याकामी आवश्यकती कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, उपरोक्त प्रस्तावास शासन मान्यता येईतोपर्यंतच्या कालावधीत शासन मान्यतेच्या अधीन राहून, गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्रे प्रशासनाने वितरीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [illegible] ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक गुलजार अ. पेंढारी

सहा.संचालक (नगररचना)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका